पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८**

सभावृत्तांत

**दिनांक - ०६/०५/२०१५** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०५/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) **मा. छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२) मा. आर.एस.कुमार
३) मा. नेटके सुमन राजेंद्र
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. जवळकर वैशाली राहुल

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.वाघ – उप अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड शहरातील बीआरटीएस बाधित नागरिकांना आरक्षित ठेवलेल्या २५७ ( दोनशे सत्तावन्न ) घरकुलातील आरक्षणातून घरकुल मिळणेबाबत – मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

**----------**

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – १
दिनांक – ०६/०५/२०१५ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.सुमन नेटके अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/तळवडे/२२/२०१५, दि. ०९/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेत मौजे तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकात ९०.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आलेला आहे. सदर विकास योजनेच्या रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला असून सदर प्रकरणी प्रथम टप्प्यातील ५२.० ते ६०.० मी. रुंद रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक क्रमांक १ पिंपरी यांचे कार्यालयात सुरु आहे. सदर ९०.०० मी. रुंद रस्त्याच्या दोन्ही टोकाकडे पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील ७५.०० मी. रस्ता प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने महापालिकेच्या विकास योजनेतही सदर ठिकाणी ९०.०० मीटर ऐवजी ७५.०० मीटर रस्ता प्रस्तावित करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याबाबत स्पाईन रस्त्याचे

आखणीबाबत नियुक्त समितीने अंतिम केलेल्या आखणीनुसार / सुचविलेनुसारची प्रस्तावित ७५.०० मी. रस्त्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु आहे. सदर फेर बदलाची प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविलेप्रमाणे ७५.०० मी.रुंद प्रस्तावित रस्त्याच्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेचे व तद्अनुषंगाने येणारा खर्च करणेचे अधिकार मा.आयुक्तांना देणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५०　　　　विषय क्रमांक – २

दिनांक – ०६/०५/२०१५　　　　विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.वैशाली जवळकर　　　　अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१३/३५/२०१५, दि. १०/०४/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०५/१०५०/प्र.क्र.-७९५/०५/नवि-१३, दिनांक – ३०/०५/०८ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टीपीएस-१८०८/८९४/सी आर-१७२७/०९/नवि-१३, दिनांक – १८/०८/०९ अन्वये भागश: मंजुर विकास योजनेतील विषयांकित मिळकतीमधून जाणारा ३०.० मी. रुंद रस्ता व २४.० मी. रुंद रस्ता प्रस्तावित आहे. मौजे च-होली येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्या दृष्टीने विषयांकित मिळकतीमधील ३०.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४५८ पै., ४५९ पै., ४६२ पै., ३८३ पै., ३६३ पै.,) व २४.० मी. रुंद रस्ता (जूना स.नं. ४६२ पै., ४५८ पै., ४६३ पै., ४६४ पै.,) ( पूर्व-पश्चिम रस्ते विकसित करणे आवश्यक आहे.) रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकांचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक आहे. विषयांकित जमिनीचे प्रचलित भुसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी विषयांकित रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ५१　　　　विषय क्रमांक – ३

दिनांक – ०६/०५/२०१५

सुचक – मा.आशा सुर्यवंशी　　　　अनुमोदक – मा.वैशाली जवळकर

संदर्भ – मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सन २०१२ पासून बी.आर.टी.एस. प्रकल्प राबविण्यात आला आहे व आज रोजी सन २०१३-२०१४ मध्ये नाशिक फाटा ते वाकड व औंध किवळे हे बी.आर.टी.एस. चालू करण्यात आले. पिंपळे गुरव स.नं.८४ व ८५ मध्ये बी.आर.टी.एस. बाधित

लोकांनी स्वत:चे घर स्वत: काढून घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगररचना विभागाला व बी.आर.टी.एस.विभागाला ताबा दिलेला असून ज्या नागरिकांनी घरकुल मिळविण्याकरीता अर्ज करुन देखील व आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना घरकुल मिळत नाही. या प्रकल्पाचा सर्वे झाला असताना सन २००६ ते २००७ मध्ये नागरिकांनी स्वत:चे कुटूंबाचे संरक्षणासाठी छोटीशी दुबार मिळकत घेतल्यामुळे १००% (शंभर टक्के) जागा व घर रस्त्यात जाऊन देखील दूबार प्रॉपर्टीमुळे नागरिकांना आरक्षणामध्ये घरकुल शिल्लक असताना घरकुल मिळत नाही. काळेवाडी बी.आर.टी.एस.रोड सर्वे नं.८० ते ९९ या सर्वे नं.मध्ये वरील प्रमाणे बी.आर.टी.एस. रोड बाधीत व दुबार प्रापर्टी असणारे नागरिक आहेत. तरी पिंपरी चिंचवड शहरातील बी.आर.टी.एस. बाधीत व दुबार प्रॉपर्टी धारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनामार्फत ई.डब्लू.एस. मधील २५७ मधील आरक्षण मधून घरकुल देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३६६ /२०१५
दिनांक : ०७/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.